महाराष्ट्र शिक्षण सेवा (प्रशासन शाखा)
मधील अधिकाऱ्यांच्या सर्वसाधारण
बदल्यामध्ये अंशत: बदल.
शिक्षणाधिकारी व तत्सम, गट-अ

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन आदेश क्रमांक : बदली ३११९/प्र.क्र.३५/प्रशा-२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : १९ जुलै, २०१९

वाचा : १. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र. : ईएसटी-३९१७/प्र.क्र.४६/प्रशा-२, दिनांक १७.०३.२०१७

२. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन आदेश, क्र. : बदली ३११९/प्र.क्र.३५/प्रशा-२, दिनांक २८.०५.२०१९

शासन आदेश-

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार दिनांक ३१ मे, २०१९ रोजी तीन वर्षाचा कालावधी पूर्ण करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या बदलीचे आदेश दिनांक २८ मे, २०१९ रोजी निर्गमित करण्यात आले आहेत. सदर आदेशान्वये श्रीमती निशादेवी बबनराव वाघमोडे यांची शिक्षणाधिकारी (प्राथ.), जि. प. सांगली या पदावरून शिक्षणाधिकारी (माध्य.), जि. प. सिंधुदुर्ग या पदावर बदली करण्यात आली होती.

२. तथापि, शिक्षणाधिकारी (माध्य.), जि. प. सिंधुदुर्ग हे पद सद्यस्थितीत रिक्त नसल्यामुळे नागरी सेवा मंडळाच्या शिफारशीस सक्षम प्राधिकाऱ्यांची पूर्व मान्यता घेऊन श्रीमती निशादेवी वाघमोडे यांची त्यांच्या नावासमोर स्तंभ क्रमांक- ४ मध्ये दर्शविलेल्या पदावर बदलीने सुधारित स्वरूपात पदस्थापना देण्यात येत आहे.

अ. क्र.	नाव व पदनाम	दिनांक २८ मे, २०१९ अन्वये करण्यात आलेली पदस्थापना	सुधारीत पदस्थापना	अभिप्राय
१	२	३	४	५
१	श्रीमती निशादेवी बबनराव वाघमोडे, शिक्षणाधिकारी (प्राथ.), जि. प. सांगली	शिक्षणाधिकारी (माध्य.), जि.प. सिंधुदुर्ग	शिक्षणाधिकारी (.माध्य), जि .प .रत्नागिरी	रिक्त पदावर

३. सदर अधिकाऱ्यांनी त्यांच्या नवीन पदाचा पदभार त्वरित स्विकारावा तसेच त्यांनी अनधिकृत रजेवर जाऊ नये. तसेच बदली रद्द करण्यासाठी कुठल्याही स्वरुपाची आवेदने सादर केल्यास, ते शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र ठरतील याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

४. आयुक्त (शिक्षण) पुणे यांनी या आदेशाप्रमाणे सदर अधिकाऱ्यांना त्यांच्या सध्याच्या पदभारातून तात्काळ कार्यमुक्त करण्याबाबत संबंधित नियंत्रण अधिकाऱ्यांना तातडीने कळवावे व बदली झालेले अधिकारी विहित कालावधीत दिलेल्या पदस्थापनेच्या ठिकाणी रुजू होतील याची खातरजमा करावी व याबाबतचा अहवाल शासनास सादर करावा.

५. संबंधित अधिकारी हे दि.२८.०५.२०१९ रोजीच्या आदेशानुसार संबंधित पदावर रुजू झाले असल्यास, हे आदेश अंमलात येणार नाहीत. आयुक्त (शिक्षण) यांनी याबाबत प्रथम खात्री करून नंतर वरीलप्रमाणे आदेश निर्गमित करावेत.

६. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०७१९१५३९०७००२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Santosh
Basaveshwar
Mamadapure

Digitally signed by Santosh Basaveshwar Mamadapure
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education and Sports, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=3bfe111652996d95372924b1d22cdf88b33dfa2a3de3d8ea011b7d83adc40cb6, serialNumber=557abe7a7194ec5ddc74df537d7d57a9dbda20b1937a2e41983c35f6a38b6ad8, cn=Santosh Basaveshwar Mamadapure
Date: 2019.07.19 15:44:06 +05'30'

(संतोष ममदापुरे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. आयुक्त, शिक्षण आयुक्तालय (मध्यवर्ती इमारत), महाराष्ट्र राज्य,पुणे
२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रत्नागिरी / सिंधुदुर्ग
३. सर्व शिक्षण संचालक
४. विभागीय शिक्षण उपसंचालक, रत्नागिरी / सिंधुदुर्ग
५. जिल्हा कोषागार अधिकारी रत्नागिरी / सिंधुदुर्ग
६. संबंधीत अधिकारी (आयुक्त (शिक्षण) यांचे कार्यालयामार्फत)

प्रत माहितीसाठी,

१. मा.मंत्री, शालेय शिक्षण यांचे विशेष कार्य अधिकारी.
२. अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे स्वीय सहायक
३. निवडनस्ती, प्रशा-२.